**17**

# ब्लू इकॉनॉमी आणि भारत

प्रा. देविदास वि. भोसले
सहायक प्राध्यापक आणि विभाग प्रमुख
संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभाग,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय(स्वायत्त)
बारामती.

प्रो. डॉ. चंद्रकांत ब. भांगे
प्रोफेसर आणि विभाग प्रमुख
सैनिक शास्त्र विभाग
श्री शिवाजी कॉलेज
परभणी.

**प्रस्तावना:**

ब्लू इकॉनॉमी या संकल्पनेचा प्रथम वापर गुंटर पॉली यांनी 2010 च्या त्यांच्या पुस्तकात केला होता. सागरी संसाधनांचा शाश्वत वापर करून आर्थिक वाढ, सुधारित उपजीविका प्राप्त करणे यासोबतच रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करणे आणि सागरी परिसंस्थेचे आरोग्य साध्य करणे. ब्लू इकॉनॉमीच्या माध्यमातून उच्च उत्पादकता आणि महासागराच्या आरोग्याच्या संवर्धनासाठी महासागर विकास धोरणांच्या हरितकरणाचे समर्थन केले जाते. ब्लू इकॉनॉमी सामाजिक समावेशासह, पर्यावरणीय शाश्वतता, नाविन्यपूर्ण व्यवसाय मॉडेलसह महासागर अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या एकात्मतेवर भर देते. शाश्वत विकास उद्दिष्ट (SDG 14) प्रमाणे, ब्लू इकॉनॉमीमध्ये शाश्वत विकासासाठी महासागर, सागरी संसाधनांचे संरक्षण आणि शाश्वतपणे वापर करण्याचे आवाहन केले जाते. ब्लू इकॉनॉमीच्या दृष्टिकोनातून पाहिले असता ब्लू इकॉनॉमीची कल्पना, तत्त्वे, निकष दारिद्र्य निर्मूलन, अन्न आणि पोषण सुरक्षा, वातावरणातील बदलांचे शमन आणि अनुकूलन आणि शाश्वत आणि समावेशी उपजीविकेच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देणे यावर जोर देण्यात येतो.

**ब्लू इकॉनॉमीमध्ये खालील गोष्टींचा अंतर्भाव होतो:**

**अक्षय ऊर्जा (Renewable Energy):** शाश्वत सागरी ऊर्जा सामाजिक आणि आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

**मत्स्यव्यवसाय (fisheries):** शाश्वत मत्स्यव्यवसायामुळे अधिक महसूल, अधिक मासे मिळू शकतात आणि मासेसाठा पुनर्संचयित करण्यात मदत होऊ शकते.

**सागरी वाहतूक (Maritime Transport):** जागतिक मालवाहतुकीच्या 80% पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय मालाची वाहतूक समुद्रमार्गे केली जाते.

**पर्यटन (Tourism):** महासागर आणि किनारपट्टीच्या भागातील पर्यटनामुळे रोजगारामध्ये आणि आर्थिक वाढ होऊ शकते.

**हवामान बदल (Climate Change):** महासागर हे महत्त्वाचे कार्बन सिंक (ब्लू कार्बन) आहेत आणि हवामान बदल कमी करण्यास मदत करतात.

**कचरा व्यवस्थापन (Waste Management):** जमिनीवर उत्तम कचरा व्यवस्थापन महासागरांना पुनर्प्राप्त करण्यात मदत करू शकते.

**ब्लू इकॉनॉमीची व्याख्या:**

विविध संस्थांनुसार ब्लू इकॉनॉमीच्या व्याख्या खालीलप्रमाणे सांगता येतील.

जागतिक बँकेच्यानुसार ब्लू इकॉनॉमी म्हणजे "महासागराच्या परिसंस्थेचे आरोग्य राखून आर्थिक वाढ, सुधारित उपजीविका आणि नोकऱ्यांसाठी सागरी संसाधनांचा शाश्वत विकास होय."

कॉमनवेल्थ ऑफ नेशन्स अनुसार ब्लू इकॉनॉमी एक उदयोन्मुख संकल्पना म्हणून परिभाषित केली आहे. ज्यामध्ये आपल्या महासागर किंवा 'ब्लू संसाधनांच्या चांगल्या व्यवस्थापनाला प्रोत्साहन दिले जाते.

ब्लू इकॉनॉमीशी संबंधित शब्द म्हणजे महासागर अर्थव्यवस्था परंतु वरकरणी या संकल्पना समानार्थी वाटत असल्या तरी त्या एकमेकांपासून भिन्न आहेत. महासागर अर्थव्यवस्था महासागर संसाधनांच्या वापरावर लक्ष केंद्रित करते आणि महासागराच्या आर्थिक व्यवस्थेला सक्षम बनविण्याचे तीचे उद्दिष्ट असते. तर ब्लू इकॉनॉमी केवळ आर्थिक वाढीची यंत्रणा म्हणून महासागर अर्थव्यवस्थेपेक्षा व्यापक दृष्टीकोन बाळगते. दुसरी संज्ञा हरित अर्थव्यवस्था आहे जिथे अर्थव्यवस्थेचा उद्देश पर्यावरणीय जोखीम कमी करणे आहे आणि पर्यावरणाचा ऱ्हास न करता शाश्वत विकासाचे उद्दिष्ट आहे. त्याचा पर्यावरणीय अर्थशास्त्राशी जवळचा संबंध आहे. त्यामुळे ब्लू इकॉनॉमी हा हरित अर्थव्यवस्थेचा एक भाग आहे. जून 2012 मध्ये रिओ+20 शिखर परिषदेदरम्यान, पॅसिफिक क्षेत्रातील लहान बेट विकसनशील देशांअनुसार, त्यांच्यासाठी, "हरित अर्थव्यवस्था ही खरं तर ब्लू इकॉनॉमी होती".

**ब्लू इकॉनॉमी बद्दल काही तथ्य पुढील प्रमाणे विषद करता येतील:**

- जगभरातील महासागर अर्थव्यवस्थेचे मूल्य दरवर्षी1.5 ट्रिलियन अमेरिकन डॉलर इतके आहे.

- व्हॉल्यूमनुसार जागतिक व्यापाराच्या ऐंशी टक्के समुद्रमार्गे होतो.

- जगभरातील 350 दशलक्ष नोकऱ्या या मत्स्यव्यवसायाशी निगडीत आहेत.

- 2025 पर्यंत कच्च्या तेलाचे 34% उत्पादन ऑफशोअर फील्डमधून येईल असा अंदाज आहे.

- जलचर प्राण्यांचे संगोपन किंवा अन्नासाठी जलीय वनस्पतींची लागवड हे सर्वात वेगाने वाढणारे अन्न क्षेत्र आहे आणि मानवी वापरासाठी सुमारे 50% मासे पुरवते.

**भारत आणि ब्लू इकॉनॉमी:**

भारताकडे ब्लू इकॉनॉमीच्या माध्यमातून फायदा घेण्यासाठी खूप क्षमता आहे. भारताचे हिंद महासागर क्षेत्र संसाधनांनी विपुल आहे, या क्षेत्राच्या माध्यमातून विशेषत: मत्स्यपालन, महासागर ऊर्जा, समुद्रातील खाणकाम आणि खनिजे, सागरी पर्यटन आणि शिपिंग क्रियाकलाप विकसित करण्यासाठी प्रचंड आर्थिक संधी प्राप्त होतात. भारतामध्ये ब्लू इकॉनॉमीला राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा एक उपसंच समजला जातो ज्यामध्ये संपूर्ण महासागर संसाधन प्रणाली आणि देशाच्या कायदेशीर अधिकारक्षेत्रातील सागर, सागरी क्षेत्रातील आणि किनारी किनारपट्टी क्षेत्रांमध्ये मानव-निर्मित आर्थिक पायाभूत सुविधांचा समावेश होतो.

- युनायटेड नेशन्स फूड अँड ॲग्रीकल्चर ऑर्गनायझेशन (FAO) च्या अहवालात असे नमूद केले आहे की इतर जागतिक महासागरामध्ये मत्स्यपालनाच्या मर्यादा संपण्याच्या जवळ असताना, हिंद महासागरासारख्या काही विशिष्ट क्षेत्रामध्ये संसाधनांचे वाढीव उत्पादन टिकवून ठेवण्याची क्षमता आहे.

- भारताच्या आर्थिक वाढीसाठी हिंद महासागर क्षेत्राचे धोरणात्मक महत्त्व आहे. तेल आणि वायू समुद्रातून आयात केला जातो आणि ब्लू इकॉनॉमीचा विकास साध्य केल्यास 2032 पर्यंत 10 ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होण्याचे भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी विकास उत्प्रेरक म्हणून काम करू शकतो.

- जहाजबांधणी मंत्रालयाने सुरू केलेला सागरमाला प्रकल्प बंदरांच्या आधुनिकीकरणासाठी IT सक्षम सेवांचा व्यापक वापर करून बंदर-नेतृत्व विकासासाठी एक धोरणात्मक पुढाकार आहे. या प्रकल्पाचा अतिरिक्त फायदा म्हणजे कोस्टल इकॉनॉमिक झोन (सीईझेड) विकसित करणे, जे भारतातील समृद्ध ब्लू इकॉनॉमीसाठी उत्प्रेरक ठरेल.

- सरकारच्या मेक इन इंडिया कार्यक्रमांतर्गत जहाजबांधणी उद्योगाला मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकतो. याचसोबत या उद्योगाच्या गुंतवणुकीवर मोठ्या प्रमाणात सकारात्मक परिणाम होईल आणि ज्यामुळे मोठ्याप्रमाणात संबंधित उद्योगांसह औद्योगिक विकासाला चालना मिळू शकते.

• भारताच्या 'ब्लू ग्रोथ इनिशिएटिव्ह' ला प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रीय मत्स्यपालन धोरणाची निर्मिती करण्यात आली आहे ज्यामुळे सागरी आणि इतर जलीय संसाधनांच्या माध्यमातून मत्स्यपालन संपत्तीचा शाश्वत वापर करण्यावर लक्ष केंद्रित केले जाते.

## भारतीयांसाठी ब्लू इकॉनॉमीसंदर्भात भविष्यातील मार्ग:

हिंदी महासागर क्षेत्राला आंतरराष्ट्रीय भागीदारीसाठी शाश्वत आणि सर्वसमावेशक फ्रेमवर्कची आवश्यकता आहे. या प्रदेशातील देशांनी या प्रदेशातील वाढत्या सुरक्षा आव्हानांचा समन्वय आणि व्यवस्थापन करणेच नव्हे तर हिंदी महासागर क्षेत्रामध्ये असलेल्या भरीव आर्थिक क्षमतेचीही जाणीव करून देणे आवश्यक आहे. भारताने यासंदर्भात आपल्या विकास प्रयत्नांमध्ये लक्षणीय वाढ केली आहे. प्रादेशिक भागीदारांसोबतचे सहकार्य बळकट करण्याची आणि शाश्वत सागरी अर्थव्यवस्था निर्माण करण्याची भारताची वचनबद्धता त्याच्या देशांतर्गत आधुनिकीकरणाच्या मोठ्या प्रकल्पांशी सुसंगत आहे ज्यामुळे महासागर आधारित ब्लू इकॉनॉमीच्या पूर्ण क्षमतेचा उपयोग करणे भारताला भविष्यात शक्य होईल.

## संदर्भसूची:


1) Blue Economy (2018) https://www.drishtiias.com/to-the-points/paper3/blue-economy

2) https://byjus.com/free-ias-prep/blue-economy/